# अमरावती महानगरपालिका अमरावती

## स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि./ १०० /2026 दिनांक :- ५ / ९ /2026

कोटेशन सूचना

**विषय :- श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने लहान मातीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी Artificial Ganesh Immersion Water Tank (कृत्रिम गणेश विसर्जन पाण्याचे टँक) खरेदी करण्यासाठी दरपत्रक / कोटेशन सादर करण्याबाबत.**

श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने अमरावती शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांकडून लहान आकाराच्या मातीच्या गणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करता यावे, तसेच नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळता यावे, यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत विविध ठिकाणी Artificial Ganesh Immersion Water Tank उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे साहित्याचा पुरवठा करण्यासाठी पात्र उत्पादक / अधिकृत वितरक / पुरवठादार यांचेकडून प्रति नग दराने सीलबंद कोटेशन / दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**1. साहित्याचा तपशील**

| अ.क्र. | साहित्याचे नाव व तांत्रिक तपशील | अपेक्षित संख्या | दर |
|---|---|---|---|
| १ | Artificial Ganesh Immersion Water Tank, क्षमता किमान ४,००० ते ५,००० लिटर, मजबूत, टिकाऊ व Leak Proof, Drain Outlet / Drain Valve सहित | २० नग | प्रति नग ₹__________ |

टीप :- कोटेशनमध्ये दर प्रति नग नमूद करणे बंधनकारक राहील.

**2. कृत्रिम विसर्जन टँकची किमान तांत्रिक वैशिष्ट्ये**

पुरवठा करण्यात येणारा Artificial Ganesh Immersion Water Tank खालील किमान तांत्रिक निकषांची पूर्तता करणारा असणे आवश्यक आहे :-

1. टँकची क्षमता किमान ४,००० ते ५,००० लिटर असावी.
2. टँक मजबूत, टिकाऊ व दीर्घकाळ वापरण्यास योग्य असावा.
3. टँक पूर्णपणे Leak Proof असावा.
4. टँकचा वापर लहान आकाराच्या मातीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी योग्य असावा.
5. टँकमध्ये पाणी बाहेर काढण्यासाठी योग्य क्षमतेचा Drain Outlet / Drain Valve असणे आवश्यक आहे.
6. Drain Valve सहजपणे चालू-बंद करता येण्याजोगा व सुरक्षित असावा.
7. टँक सार्वजनिक ठिकाणी ठेवण्यासाठी व वापरण्यासाठी सुरक्षित असावा.
8. टँकची रचना अशी असावी की त्यामध्ये गणेशमूर्ती विसर्जित करताना नागरिकांना अडचण निर्माण होणार नाही.
9. टँक हलविणे, वाहतूक करणे व आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी ठेवणे सुलभ असावे.
10. टँकची गुणवत्ता व मजबुती समाधानकारक असणे आवश्यक आहे.
11. टँकच्या क्षमतेचा व तांत्रिक तपशीलाचा पुरवठादाराने कोटेशनमध्ये स्पष्ट उल्लेख करावा.
12. आवश्यक असल्यास टँकची प्रतिमा / तांत्रिक माहितीपत्रक / Specification Sheet कोटेशनसोबत सादर करावे.

**3. पुरवठ्याचा व्याप्ती**

पुरवठादाराने मंजूर दरामध्ये खालील सर्व बाबींचा समावेश करणे अपेक्षित आहे :-

a) टँक तयार करणे / उपलब्ध करून देणे.
b) पॅकिंग व हाताळणी.
c) लोडिंग.
d) वाहतूक.

Scanned with OKEN Scanner

e) अनलोडिंग.
f) अमरावती शहरातील संबंधित विसर्जन स्थळी टँक पोहोचविणे.
g) आवश्यक Drain Valve / Drain Outlet व संबंधित फिटिंग.
h) टँक योग्य ठिकाणी ठेवण्यास आवश्यक प्राथमिक व्यवस्था.
i) इतर सर्व अनुषंगिक खर्च.

वरीलपैकी कोणताही खर्च दरामध्ये समाविष्ट नसल्यास तो कोटेशनमध्ये स्वतंत्रपणे स्पष्ट नमूद करणे आवश्यक राहील.

**4. पुरवठ्याची कालमर्यादा**

A. निवड झालेल्या पुरवठादाराने आदेश प्राप्त झाल्यानंतर ३ दिवसाच्या आत टँकचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
B. श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने सदर टँक वेळेत उपलब्ध होणे अत्यावश्यक असल्याने विलंब झाल्यास महानगरपालिकेस नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचा अधिकार राहील.

**5. प्रस्तावित ठिकाणी पुरवठा**

खरेदी करण्यात येणारे Artificial Ganesh Immersion Water Tank अमरावती शहरातील महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या विविध ठिकाणी पोहोचविणे आवश्यक राहील.
प्रस्तावित ठिकाणांमध्ये खालील ठिकाणांचा समावेश आहे :-

1. अभियंता भवन, शेगाव नाका
2. सहकार नगर, ग्राउंड
3. फार्मसी शासकीय महाविद्यालय, कठोरा नाका
4. आराधना बिल्डिंग जवळ, रिंग रोड
5. चाणक्य हॉटेल, नागपूर रोड
6. शिवाजी कमर्शियल मार्केट, रवी नगर
7. नेहरू मैदान
8. प्रशांत नगर बगिचा
9. मालटेकडी जवळ
10. वडाळी
11. विद्यापीठ चौक, पुलाजवळ
12. मोती नगर, बगीचा
13. साई नगर, साई मंदिराजवळ
14. बडनेरा, झिरो तलाव
15. गोपाल नगर, जिम जवळ
16. बडनेरा, बारीपुरा
17. रवी नगर
18. महाजनपुरा हनुमान नगर
19. बुधवारा
20. महानगरपालिकेकडून आवश्यकतेनुसार निश्चित करण्यात येणारे अतिरिक्त ठिकाण.

टीप :- वरील ठिकाणांमध्ये महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आवश्यकता व स्थळ उपलब्धतेनुसार बदल करण्यात येऊ शकतो.

**6. प्रमाण कमी-जास्त करण्याबाबत**

कोटेशनमध्ये अपेक्षित प्रमाण २० नग नमूद करण्यात आलेले असले तरी प्रत्यक्ष आवश्यकता, उपलब्ध निधी, स्थळांची उपलब्धता व प्रशासकीय मान्यता यानुसार २० नगांपेक्षा कमी किंवा जास्त प्रमाणात साहित्य खरेदी करण्याचा अधिकार मा. आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना राहील.

त्याबाबत पुरवठादारास कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त दावा करता येणार नाही.

**7. कोटेशन सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**

इच्छुक पात्र उत्पादक / पुरवठादार / अधिकृत वितरक यांनी आपले कोटेशन दिनांक /०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्वच्छता विभाग, अमरावती महानगरपालिका, स्वच्छता विभाग येथे सादर करावे. निर्धारित दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेल्या कोटेशनचा विचार करणे अथवा न करणे याबाबतचा अधिकार महानगरपालिकेकडे राहील.

Scanned with OKEN Scanner

### कोटेशनसोबत सादर करावयाची कागदपत्रे

पुरवठादाराने कोटेशनसोबत खालील कागदपत्रे सादर करावीत :-

1. फर्म / संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता.
2. GST Registration Certificate.
3. PAN Card ची प्रत.
4. अधिकृत स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे प्राधिकृत पत्र, आवश्यक असल्यास.
5. उत्पादक / अधिकृत वितरक असल्याचा पुरावा, लागू असल्यास.
6. टँकचा तांत्रिक तपशील / Specification Sheet.
7. टँकची क्षमता व बांधणीबाबत माहिती.
8. Drain Valve / Drain Outlet चा तपशील.
9. संपर्क क्रमांक व ई-मेल.

**9. गुणवत्ता तपासणी**

महानगरपालिकेस पुरवठा करण्यात आलेल्या टँकची गुणवत्ता, क्षमता, मजबुती, Leak Proof स्थिती, Drain Valve व इतर तांत्रिक बाबी तपासण्याचा अधिकार राहील.तांत्रिक Specification प्रमाणे नसलेला अथवा निकृष्ट दर्जाचा टँक स्वीकारला जाणार नाही.आवश्यक असल्यास संबंधित अधिकारी / अभियंता / तांत्रिक प्रतिनिधीमार्फत टँकची तपासणी करण्यात येईल.

साहित्य पुरवठा करतांना टँक लिकेज असल्यास त्याच वेळी दुसरे टँक पुरवठा धारकाला त्याच वेळी बदलून देणे आवश्यक राहील

**10. दरामध्ये बदलाबाबत**

कोटेशन सादर केल्यानंतर मंजूर / स्वीकारलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ मागता येणार नाही.

11. देयकाबाबत

पुरवठा पूर्ण झाल्यानंतर व संबंधित स्वास्थ निरीक्षक/जेष्ठ स्वास्थ निरीक्षक यांचेकडून साहित्य समाधानकारक असल्याचे प्रमाणित झाल्यानंतर, उपलब्ध निधी व महानगरपालिकेच्या प्रचलित नियमांनुसार देयक अदा करण्यात येईल.

देयकासाठी आवश्यक बिल, GST Invoice, Delivery Challan व संबंधित प्रमाणपत्रे पुरवठादाराने सादर करणे आवश्यक राहील.

**12. वाहतूक व वितरण**

सदर टँक महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या ठिकाणी पोहोचविण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. वाहतूक, लोडिंग, अनलोडिंग व संबंधित अनुषंगिक खर्चासाठी स्वतंत्र दावा करता येणार नाही, जर तो खर्च कोटेशनमधील मंजूर दरामध्ये समाविष्ट केलेला असेल.

**13. कोटेशन स्वीकारण्याचा अधिकार**

1. प्राप्त कोटेशनपैकी तांत्रिकदृष्ट्या योग्य व आर्थिकदृष्ट्या सक्षम दराचा विचार करून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
2. महानगरपालिकेस कोणतेही किंवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार राहील.
3. सर्वात कमी दराचे कोटेशन प्राप्त झाले म्हणून सदर कोटेशन स्वीकारणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही.

**14. कोटेशन रद्द करण्याबाबत**

प्राप्त कोटेशनमध्ये तांत्रिक त्रुटी, अपूर्ण माहिती, आवश्यक कागदपत्रांचा अभाव, अवाजवी दर किंवा इतर कोणतेही कारण आढळल्यास सदर कोटेशन विचारात न घेण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

**15. करार / आदेशाच्या अटी**

निवड झालेल्या पुरवठादारास महानगरपालिकेकडून Supply Order / Purchase Order देण्यात येईल. सदर आदेशातील अटी व शर्तींचे पालन करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

16. निरीक्षण व स्वीकृती
पुरवठा केलेल्या प्रत्येक टँकची संख्या, क्षमता, गुणवत्ता, Leak Proof स्थिती, Drain Valve व इतर आवश्यक बाबींची तपासणी करूनच त्याची स्वीकृती देण्यात येईल.महानगरपालिकेच्या तपासणीत दोष आढळल्यास संबंधित टँक पुरवठादाराने स्वत:च्या खर्चाने बदलून / दुरुस्त करून देणे आवश्यक राहील.

17. अनुषंगिक अटी
1. कोटेशन स्पष्ट व वाचनीय स्वरूपात असावे.
2. प्रत्येक पानावर अधिकृत स्वाक्षरी व शिक्का असावा.
3. खाडाखोड असल्यास त्यावर अधिकृत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
4. कोटेशनमध्ये फर्मचा संपर्क क्रमांक नमूद करावा.
5. एकदा सादर केलेला दर अंतिम मानला जाईल.
6. महानगरपालिकेच्या सूचनेनुसार टँक संबंधित ठिकाणी पोहोचविणे बंधनकारक राहील.
7. पुरवठादाराने टँकची गुणवत्ता व टिकाऊपणाची जबाबदारी स्वीकारावी.
8. गणेशोत्सवाच्या कालावधीत तातडीच्या स्वरूपात आवश्यक दुरुस्ती / बदलाची आवश्यकता असल्यास पुरवठादाराने सहकार्य करावे.
9. महानगरपालिकेच्या मालमत्तेचे किंवा सार्वजनिक ठिकाणाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची राहील.
10. कोणत्याही परिस्थितीत महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय मंजूर Specification मध्ये बदल करता येणार नाही.

**18. महत्त्वाची सूचना**
सदर खरेदी ही श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येत आहे. त्यामुळे पुरवठादाराने टँकचा पुरवठा वेळेत, योग्य ठिकाणी व मंजूर तांत्रिक Specification नुसार करणे आवश्यक आहे.

**19. खर्चाचे लेखाशीर्ष**
सदर खरेदीसाठी येणारा खर्च "दैनंदिन साफसफाई व स्वच्छता व्यवस्थापन" लेखाशीर्ष क्र. १४७ मधून करण्यात येणार आहे.

**20. कोटेशन सादर करण्याचा पत्ता:**-वैद्यकीय अधिकारी ( स्वच्छता),महानगरपालिका, अमरावती.
कोटेशन सादर करण्याची अंतिम तारीख : ११/०९/२०२६
अंतिम वेळ : दुपारी ४.०० वाजेपर्यंत

**(मा. अतिरिक्त आयुक्त -२, मनपा अमरावती यांचे मान्यतेने)**

**वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)**
**महानगरपालिका,अमरावती**

प्रतिलिपी:-
1) मा. आयुक्त, मनपा अमरावती यांचे माहिती करिता सविनय सादर.
2) मा. अतिरिक्त आयुक्त २, मनपा अमरावती यांचे माहिती करिता सविनय सादर.
3) मा. उप-आयुक्त, मनपा अमरावती यांचे माहिती करिता सादर.

Scanned with OKEN Scanner